महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २२ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# बदलापुर नगरपालिकेत भाजपाची एक हाती सत्ता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर : कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून बदलापुरात भाजपाचे कमळ फुलले आहे. नगराध्यक्षपदी भाजपाच्या रुचिता घोरपडे यांनी विजय मिळविला आहे. २४ प्रभागातील नगरसेवक पदाच्या ४९ जागांपैकी २६ जागा भाजपा राष्ट्रवादी युतीला मिळाल्या आहेत. त्यामुळे कुळगाव बदलापूर नगर परिषदेत भाजपा राष्ट्रवादी युतीच्या सत्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे.**




कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल रवीवारी (ता.२२ ) जाहीर झाला. आदर्श विद्या मंदिर शाळेत सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीला नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या मतमोजणीला सुरुवात झाली आणि भाजपच्या उमेदवार रुचिता घोरपडे यांच्या विजयावर शिक्कामोर्तब होत गेले. मतमोजणीच्या पहिल्या फेरीतच रुचिता घोरपडे यांनी १७९१ मतांची आघाडी घेतली. त्यानंतर ११ व्या फेरीपर्यंत त्यांनी आघाडी कायम ठेवली. ११ व्या व १२ व्या फेरीत मतदानाची आघाडी थोडीशी कमी झाली. मात्र पुन्हा आघाडी मिळवत त्यांनी विजयश्री खेचून आणली. आणि अखेरच्या फेरीपर्यंत रुचिता घोरपडे यांनी ६४ हजार ६०४ मते मिळवत प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेना शिंदे गटाच्या वीणा म्हात्रे यांचा ७६३४ मतांनी पराभव केला. २००५ नंतर पहिल्यांदाच बदलापुरात नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडले गेले असून रुचिता घोरपडे या बदलापूरच्या दुसऱ्या थेट नगराध्यक्ष ठरल्या आहेत.

## किंग मेकर आमदार किसन कथोरे अप्पाच

### बदलापुरात कमळ फुलले..

नगरसेवक पदासाठी शिवसेना शिंदे गट व भाजपा राष्ट्रवादी युतीत सरळ लढत पाहायला मिळाली. या लढतीत शिंदेच्या शिवसेनेने २४ व भाजपा राष्ट्रवादी युतीने २६ जागा जिंकल्या आहेत. मतमोजणी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून जसजशी विजयी उमेदवारांची नावे जाहीर केली जात होती. तसतसा शहरातील विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांकडून जल्लोष करण्यात येत होता. गुलालाची उधळण करत, वाद्यांच्या गजरात होत असलेल्या या जल्लोषामुळे मतमोजणी केंद्राजवळच्या रस्त्यावर विजयाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत होता. दरम्यान, मतमोजणी केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावर गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी हा रस्ता बंद करण्यात आला होता. तसेच रस्त्याच्या सर्व बाजूनी बॅरिकेड्स उभारून तेथे पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

बदलापूर नगरपालिकेत वामन म्हात्रे अवघ्या 32 मताने विजयी. मुलगा वरून सह पत्नी विना यांचा पराभव, भाऊ तुकाराम म्हात्रे पती पत्नी विजयी.

**पती, पत्नी, नणंद विजयी**

प्रभाग क्रमांक ४ अ आणि ४ ब मधून शिवसेनेचे उमेदवार श्रीधर पाटील व त्यांच्या पत्नी स्वप्ना पाटील विजयी झाले आहेत. मात्र, श्रीधर पाटील यांची सख्खी बहीण रिद्धिता घोरपडे प्रभाग क्रमांक ७ अ मधून भाजपच्या तिकिटावर विजयी झाल्या आहेत.

**भाजपमुळे पोटनिवडणूक**

प्रभाग क्रमांक ३ अ मध्ये पोटनिवडणूक होणार आहे. कारण, या प्रभागातून भाजपच्या रुचिता घोरपडे विजयी झाल्या आहेत. त्यांना या प्रभागात ४७९८ मते पडली. मात्र, त्या नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी देखील निवडून आल्याने त्या या प्रभागात राजीनामा द्यावा लागणार आहे.

**राष्ट्रवादीच्या प्रियांका दामलेसह तीन महिला उमेदवार विजयी**

प्रभाग क्रमांक ६ अ मधून राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) गटाच्या प्रियांका दामले यांच्यासह प्रभाग क्रमांक ५ अ मधून सुगंधा पाटील तर ५ ब मधून हर्षाली गायकवाड या तीन उमेदवार विजयी झाल्या आहेत. या विजयानंतर परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस कॅप्टन आशिष दामले व राष्ट्रवादीचे बदलापूर शहराध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**महाविकास आघाडी निष्प्रभ**

कुळगाव बदलापूर नगर परिषद निवडणुकीसाठी शरद पवारांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस, मनसे व मित्रपक्षांची महाविकास आघाडी झाली होती. मात्र महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही.

**हा विजय जनतेचा विजय असेल. विजयासाठी आमदार किसन कथोरे यांनी अथक मेहनत घेतली आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष लक्ष असल्यामुळे यापुढे आमची वाटचाल स्मार्ट सिटीच्या दिशेने असेल. येणारा प्रत्येक दिवस बदलापूरच्या विकासासाठी असेल. - रुचिता घोरपडे**

**नवनिर्वाचित नगराध्यक्ष : बदलापूर**

---

## अंबरनाथ नगरपालिकेत भाजपचा नगराध्यक्ष
## खासदार श्रीकांत शिंदेना मोठा धक्का

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र तसेच शिवसेनेचे संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघातील अंबरनाथ नगर परिषदेत भाजपने जोरदार धक्का दिला आहे. येथे भाजपच्या तेजश्री करंजुले यांनी शिंदेंच्या शिवसेनेच्या मनिषा वाळेकर यांचा ६ हजार ३७१ मतांनी पराभव केला आहे. त्यामुळे शिवसेनेच्या बालेकिल्ल्याला सुरूंग लागला आहे. येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीन सभा घेतल्या होत्या.

तर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी अनेक सभा घेत रॅलीही काढली होती. त्यानंतरही नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शिवसेनेला पराभव स्विकारावा लागला आहे. शहरात शिवसेनेचे २७नगरसेवक निवडून आले आहे. तर नगराध्यक्ष पद मिळाले असले तरी भाजपच्या नगरसेवकांची संख्या १४ वरच मर्यादीत राहिली आहे. तर काँग्रेसने १२ जागांवर मुसंडी मारली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला चार जागा मिळाल्या असून दोन जागी अपक्ष निवडून आले आहेत.

**अंबरनाथ नगरपालिकेत सेनेला स्पष्ट बहुमत नाही**
**अवघे 27 नगरसेवक विजयी**
**भाजपाने स्व बळावर 14 नगरसेवक निवडून आणले**

| अध्यक्ष पद | | |
|---|---|---|
| [कमळ] | करंजुले पाटील तेजश्री विश्वजीत | 54093 |
| [धनुष्यबाण] | मनिषा अरविंद वाळेकर | 47576 |
| [हात] | पाटील नूतन प्रदीप | 21592 |
| [घड्याळ] | पाटील अश्विनी सचिन | 7043 |
| [मशाल] | अंजती निशिकांत राऊत | 4953 |
| NOTA | NOTA | 2282 |
| [हत्ती] | कमल शिवाजी रणदिवे | 591 |
| [कॅमेरा] | कांबळे जयश्री एकनाथ | 454 |
| [पंखा] | बैनी इंदिरा चंद्रशेखर | 208 |

२० दिवस निवडणुका पुढे गेल्याने भाजपला प्रचारासाठी वेळ मिळाला. त्याचा उत्तम उपयोग करत भाजपने आघाडी घेतली. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठी भाजपने अधिक मते मिळवली. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासून भाजपच्या तेजश्री करंजुले यांना आघाडी मिळाली. ती काही फेऱ्यांमध्ये कमी अधिक झाली. मात्र अठराव्या फेरीपर्यंत करंजुले आणि वाळेकर यांच्यातील मतांचा फरक हा ६ हजार ३७१ मतांपर्यंत पोहोचला होता. ठाणे जिल्ह्यातील या दोन्ही नगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात होत्या. आता दोन्ही नगरपालिका भाजपा च्या ताब्यात गेल्या आहेत. शिवसेनेला ठाणे जिल्ह्यात मोठा धक्का देत भाजपाने आपले वर्चस्व असल्याचे दाखवून दिले आहे.

---

## पालघर मध्ये सत्ताधाऱ्यांना संमिश्र यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : पालघर जिल्ह्यामध्ये झालेल्या पालघर, डहाणू व जव्हार नगरपरिषद तसेच वाडा नगरपंचायत करिता झालेल्या दरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाने पालघर व डहाणू या शहरांमध्ये भरघोस मताधिक्क्याने विजय मिळवला असून जव्हार व वाडा येथे भाजपाचे उमेदवार विजयी झाले आहेत.पालघर मध्ये शिवसेनेने आपले पूर्वीप्रमाणे वर्चस्व राखले असून भाजपाला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. चार वेळा उपनगराध्यक्ष पद भूषविलेले उत्तम घरत यांनी (शिवसेना शिंदे) भाजपाच्या कैलास म्हात्रे यांचा ५१५३ मतांनी पराभव केला. पालघर मध्ये ३० सदस्यांच्या जागांपैकी शिवसेना (शिंदे) पक्षाला १९, भाजपाने आठ तर शिवसेना (ठाकरे) पक्षाने तीन जागांवर विजय मिळवला आहे.

### पालघर आकडेवारी

| जव्हार नगरपरिषद एकूण जागा 20 | पालघर नगर परिषद एकूण जागा 30 | वाडा नगरपंचायत एकूण जागा 17 | डहाणू नगर परिषद एकूण जागा 27 |
|---|---|---|---|
| भाजप 14 | शिवसेना शिंदे गट 19 | भाजप 10 | भाजप. 17 |
| शिवसेना शिंदे 2 | भाजप 8 | शिवसेना शिंदे 3 | शिवसेना शिंदे 2 |
| अजित पवार राष्ट्रवादी 3 | ठाकरे शिवसेना 3 | ठाकरेंची शिवसेना 1 | राष्ट्रवादी शरद पवार 8 |
| शरद पवार राष्ट्रवादी 1 | | अजित पवार राष्ट्रवादी 1 | |
| | | शरद पवार राष्ट्रवादी 1 | |
| | | कॉंग्रेस 1 | |
| **भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पूजा उदावंत विजयी** | **शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार उत्तम घरत विजयी** | **भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रीमा गंधे विजयी** | **शिवसेना शिंदे गटाचे डहाणू नगराध्यक्ष पदाची उमेदवार राजेंद्र माच्छी विजयी** |


---

## 75 टक्के नगराध्यक्ष महायुतीचे
## 48 टक्के नगरसेवक एकट्या भाजपाचे

### फडणवीसांनी आकड्यांसह सांगितली ताकद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मी यापूर्वीच भाकीत केले होते की, एकूण जे काही नगराध्यक्ष निवडून येतील त्यांपैकी ७५ टक्के हे महायुतीचे निवडून येतील. त्याच पद्धतीचा कौल जनतेने दिला आहे. विशेतः भारतीय जनता पक्ष हाच पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहे, हे देखील पुन्हा एकदा अधोरेखित झाले, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच, गेल्या २०-२५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहास एवढा मोठा विजय कुणालाच मिळालेला नाही. जो आज भाजपा आणि महायुतीला मिळाला आहे, असा दावाही त्यांनी यावेळी केला. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.



फडणवीस म्हणाले, "आतापर्यंत आलेल्या निकालानुसार, जवळपास १२९ नगराध्यक्ष हे भारतीय जनता पक्षाचे निवडून आले आहेत. आपण बघितले तर, आम्हा तिघांचे मिळून जवळपास ७५ टक्के नगराध्यक्ष आहेत. तसेच नगरसेवकांचा विचार केल्यास भारतीय जनता पक्षाने नवा विक्रमच नोंदवला आहे. २०१७साली आम्ही क्रमांक एकचा पक्ष होतो, त्यावेळी आमचे (भाजपा) १६०२ नगरसेवक होते. आता त्याच्या दुपटीहूनही अधिक ३३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे, एकूण नगरसेवकांच्या तुलनेत ४८ टक्के एवढे एकट्या भाजपचे निवडून आले आहेत. अर्थात प्रचंड मोठं जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे."

"विशेषतः आमचे सहकारी एकनाथराव शिंदे आणि अजित पवार यांचेही मी अभिनंद करतो. त्यांच्याही पक्षाने अतिशच चांगला परफॉर्मन्स दिला आहे. एक प्रकारे विधानसभेचा परफॉर्मन्स आम्ही रिपिट केला आहे. पहिल्यांदाच आमचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात ही निडवणूक होत होती आणि या निवडणुकीत एक मोठं यश भारतीय जनता पक्षाला मिळालं या बद्दल मी रविंद्र चव्हाण यांचेही अभिनंदन करतो. हा एक अभूतपूर्व विजय मिळाला आहे. महत्वाचे म्हणजे, २०१७ पेक्षाही हा विजय मोठा आहे. गेल्या २०-२५ वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहास एवढा मोठा विजय कुणालाच मिळालेला नाही. जो आज भाजपा आणि महायुतीला मिळाला आहे, असेही फडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे म्हणाले, "सर्वात महत्वाचे म्हणजे या निवडणुकीत मी अत्यंत सकारात्मक प्रचार केला. एकाही सभेत एकाही व्यक्तीच्या विरोधात अथवा पक्षाच्या विरोधात बोललो नाही, केवळ विकासावर मते मागीतली, आम्ही काय केले आणि काय करणार आहोत, हे सांगितले आणि त्याला सर्व मतदारांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिला. ही भारताच्या इतिहासातील पहिली निवडणूक असेल, ज्यात एखाद्या पक्षाचा मुख्यमंत्री कुणावरही एक सूतभरही टीका न करता, त्यांचा पक्ष विजयी होतो. एक प्रकारे लोकांनी आमच्या विकास कामांना दिलेली ही तर पावती आहे." दरम्यान, महाराष्ट्राच्या जनतेने भारतीय जनता पक्षाला आणि आमच्या महायुतीला प्रचंड मोठे समर्थन दिले आहे, असे म्हणत, मी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले, असेही फडणवीस म्हणाले.

---

## 2026 च्या दिनदर्शिकेचे आ. किसन कथोरेंच्या हस्ते प्रकाशन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर शहर कुणबी समाज संघा तर्फे काढण्यात आलेल्या सन 2026 च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार किसन कथोरेंच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाचे ध्यक्ष सदानंद सुरोशे यांच्या सह कुणबी समाज बांधव उपस्थित होते.











# सौ. कमलताई किसन कथोरे म्हसा महाविद्यालयाचा दोन दिवसीय "जीवनदीप कला महोत्सव" संपन्न








**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**म्हसा :** महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा, व्याख्याने आयोजित करीत असते. प्रत्येक स्पर्धेमध्ये मग ती क्रीडा असो वा कला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला पाहिजे असे महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांना नेहमीच सांगणे असते आणि महाविद्यालय या सर्वांसाठी नेहमीच प्रोत्साहन देत असते. दर वर्षी सांस्कृतिक विभागामार्फत महाविद्यालयात मोठ्या प्रमाणावर कला महोत्सवाचे आयोजन करण्यात येते आणि विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा योग्य ते व्यासपीठ मिळावं याच अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील "जीवनदीप कला महोत्सव २०२५" हा शुक्रवार दि. १९ डिसेंबर ते शनिवार दि. २० डिसेंबर, २०२५ या दरम्यान घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रा. योगेश माळी सर आणि विधी महाविद्यालय म्हसा च्या प्राचार्या मा. सौ. कृष्णा अय्यर मॅम यांच्या हस्ते जीवनदीप कला महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या दोन्ही प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. आणि त्यानंतर कला महोत्सवातील पहिल्या दिवसातील स्पर्धांना सुरुवात झाली. या दोन दिवसीय कला महोत्सवात निबंध, पोस्टर मेकिंग, पाककला, मेहंदी, नेल आर्ट, रांगोळी, काव्यवाचन, वक्तृत्व, गायन, पारंपरिक वेशभूषा, मोबाईल फोटोग्राफी, मिस्टर अँड मिस जीवनदीप अशा एकूण १२ स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कला महोत्सव यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विजय सोनार सर, प्रा. तनुजा देसले मॅडम (सदस्य - सांस्कृतिक विभाग) तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. सर्व प्राध्यापकांनी उत्तमरीत्या विविध स्पर्धांचे योग्य असे परीक्षण केलं आणि आपली परीक्षकाची भूमिका चोखपणे पार पाडली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय सोनार यांनी केलं तर आभारप्रदर्शन प्रा. तनुजा देसले मॅडम यांनी केलं. अशा रीतीने अगदी उत्साहपूर्ण वातावरणात हा दोन दिवसीय कला महोत्सव पार पडला.

## लोखंडी सलईचा अपहार करून विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील)** : लोखंडी सलईचा अपहार करून विक्री करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली आहे.

ठाणे ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रातील मुंबई आग्रा महामार्ग जवळ मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरू असून या अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलिसांनी मोहीम हाती घेतली आहे. या अनुषंगाने 15 डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण अंतर्गत वासिंद युनिटचे पथक ठाणे ग्रामीण जिल्ह्याचे कार्यक्षेत्रात अवैध धंद्याविरुद्ध कारवाई करण्याकरता गस्ती फिरत असताना गस्ती दरम्यान नमूद पथकास गुप्त बातमी प्राप्त झाली की, शहापूर तालुक्यातील मौजे कांबारे गांव हद्दीतील पावर हाऊस समोरील बंद बंगल्याचे लगत महामार्गावरून लोखंड सलई वाहतूक करणारे ट्रकचालक यांच्याशी काही लोक संगनमत करून ट्रेलर मधील लोखंडी सलईचा माल काढून अपहार विक्री करीत आहेत अशी माहिती मिळाल्यानंतर पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता याठिकाणी अवैध सळईचा अपहार करणाऱ्या इसमाना रंगे हात पकडून या इसमांवर कारवाई करण्यात आली.

यामध्ये ट्रेलर व त्यामधील 34 लाख 2 हजार 400 रूपये किंमतीचा लोखंड सलई जप्त करून या सळईंचा अपहार करणारे इसम शहानवाज निजाम शेख व सर्फराज उर्फ अस्लम गफार शेख यांच्या विरुद्ध शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी एस स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या नेतृत्वात पो.उप. महेश कदम, दीपेश किणी, स.फौ.प्रकाश साहिल, पो.ह. संतोष सुर्वे, पो. शि. स्वप्निल बोडके सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीण तसेच शहापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे, पो. हवा गोरखनाथ घुगे, मंजूर शेख यांनी केली आहे. तर सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षक महेश कदम करीत आहेत.

## कल्याणमध्ये "यहाँ के हम सिकंदर" दिव्यांग कलामहोत्सव
### २०० दिव्यांग बालकलाकारांनी जल्लोषात केला सादर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड.निलम शिर्के - सामंत यांच्या संकल्पनेतून दिव्यांग मुलांचा कलामहोत्सव " यहाँ के हम सिकंदर "१८ डिसेंबर २०२५ रोजी मराठा मंदिर हॉल कल्याण पश्चिम येथे मोठ्या दिमाखात संपन्न झाला.बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती आयोजित,बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.**

नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष श्री.रविंद्र सावंत, बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या अध्यक्षा श्रीमती.सुजाता डांगे,प्रमुख कार्यवाह श्री.शिवाजी शिंदे,उपाध्यक्ष श्री. संजय गावडे, कार्यकारिणी सदस्य श्री.योगेश कल्हापुरे,कोषाध्यक्ष भालचंद्र घाटे, या मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व नटराज पूजन करून उद्घाटन सोहळा संपन्न झाला. महोत्सवाला बालरंभूमी परिषद मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष श्री.नंदकिशोर जुवेकर यांनी विशेष उपस्थिती दर्शवली तर सहकार्यवाह श्री.विशाल पितळे,श्रीमती. मेघा शृंगारपुरे,कार्यकारिणी सदस्य श्री.सौरभ रमेश आरोटे,श्री.भूषण मेहेर,श्रीमती.सई मेहेर श्रीमती. प्रेमा सातपुते यांनी महोत्सवाचे उत्तम नियोजन केले. प्रमुख कार्यवाह श्री.शिवाजी शिंदे यांनी प्रास्ताविक केले.नाट्यपरिषद कल्याण शाखा अध्यक्ष श्री.रविंद्र सावंत,ज्येष्ठ रंगकर्मी अण्णा हांडोरे व शिवाजी शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना दिव्यांग बालकलावंतांचे









भरभरून कौतुक करून कलाकारांना प्रोत्साहन देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.महोत्सवाचे भव्यदिव्य देखणे आयोजन बघून सहभागी शाळा व संस्थांनी कल्याण बालरंगभूमी परिषद शाखेचे कौतुक करून दिव्यांग बालकलावंतांना रंगमंच उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

या कलामहोत्सवामध्ये १० दिव्यांग शाळेतील २०० बालकलाकारांनी सहभाग घेतला होता. दिव्यांग बालकलाकारांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक सदरीकरणांनी सर्व रसिक प्रेक्षक भारावून गेले आणि रसिकप्रेक्षकांनी टाळयांच्या गजरात उत्तम प्रतिसाद दिला.श्री.शिवाजी शिंदे यांनी मराठा मंदिर हॉल सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्याबद्दल पदाधिकारी,विश्वस्त यांचे आभार मानले तसेच समाजसेवक बीजेपी नेते श्री.अमित धाक्रस,श्री.वरुण पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सांस्कृतिक सेल अध्यक्ष श्री.हेमंत यादगिरे व कल्याण नाट्यपरिषदचे माजी कार्यकारिणी सदस्य श्री. सुनिल जाधव यांनी महोत्सवाला विशेषसहकार्य केल्याबद्दल त्यांचेही आभार मानले. त्यानंतर सर्व सहभागी शाळा व संस्थांचा रोख रक्कम तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला व सहभागी सर्व बाल कलाकार,शिक्षक व पालक यांना खाद्य पदार्थांचे पाकीट वाटप करण्यात आले. महोत्सवाला सिटीन्यूज च्या पत्रकार श्रीमती.चारुशीला पाटील, दैनिक जनमतचे पत्रकार श्री.विलास भोईर ,जीवनदीप वृत्तपत्राचे पत्रकार तसेच सल्लागार श्रीमती.मीनल ठाकोर, श्री दत्तात्रय जाधव कु.सिद्धेश यादगिरे,अभिनेता श्री.गणेश वाघमारे आदि मान्यवर आवर्जून उपस्थित होते.बालकलाकार कुमारी.स्वरांगी जानवे हिने संपूर्ण कालमहोत्सवाचे अप्रतिम असे निवेदन केले.

## कल्याण-शीळ परिसरातून मादी 'सोनेरी कोल्ह्याचे' यशस्वी रेस्क्यू



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण शीळ रोडवरील पडले गाव, मुक्त रेसिडेन्सी परिसरात एका वन्यप्राण्याचा वावर असल्याची माहिती शिळ फाटा अग्निशमन दलाने वनविभागास कळविली होती. या माहितीची तात्काळ दखल घेत ठाणे वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाने तातडीने रेस्क्यू मोहीम राबवून एका मादी सोनेरी कोल्ह्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेतले.
हि कारवाई वन परिमंडळ अधिकारी संदीप मोरे, कळवा वन परिमंडळाचे कर्मचारी वृंद आणि व्ही चॅरिटेबल ट्रस्ट आणि डीलॉ संस्थेचे वन्यजीव स्वयंसेवी विशाल कंथारिया यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली. रेस्क्यू करण्यात आलेली मादी अंदाजे १ ते २ वर्षे वयाची असून, ती वन्यजीव संरक्षण कायद्याच्या 'शेड्यूल १' अंतर्गत संरक्षित आहे.

सध्या या वन्यप्राण्याला पुढील वैद्यकीय तपासणी व निरीक्षणासाठी वन्यजीव परागमन केंद्र, डायघर येथे हलवण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर आहे. वनविभागाच्या नियमांनुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, नागरिकांनी वन्यजीव आढळल्यास तात्काळ वनविभागाच्या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन वन परिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांनी केले आहे.

## घराच्या मालकी हक्काच्या वादातून भावाची निर्घृण हत्या!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** वासिंद जवळील पिवळी ( वांगडपाडा वांद्रे) येथे घराच्या मालकी हक्का वरून वाद झाल्याने आपल्याच भावाची धारदार शस्त्राने छातीवर व पाठीवर वार करून व भोसकून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारल्याची घटना घडली असून या आरोपीस वासिंद पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर व त्यांच्या पथकाने लागलीच अटक करून त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

याबाबत वासिंद पोलीस सूत्रा कडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक 18/ 12/ 2025 रोजी दुपारी पंडित कृष्णा भवर, व सुमेश कृष्णा भवर या दोघांमध्ये घराच्या मालकी हक्कावरून वाद निर्माण झाला या वादातून पंडित कृष्णा भवर 27वर्ष याने रागाच्या भरात आपला भाऊ सुमेश कृष्णा भवर 25वर्ष यावर धारदार शस्त्राने छातीवर व पाठीवर वार करून त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारले याबाबत वासिंद पोलीस स्टेशन येथे बाईची पाडा वांद्रे येथील लहू तान्हू भवर याने सायंकाळी वासिंद पोलीस स्टेशन येथे खबर देऊन घटना घडल्याची माहिती दिली. प्रशासकीय कामाचा प्रचंड अनुभव असणारे व या भागातील गुन्हेगारी कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे डॅशिंग पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर यांनी घडलेल्या घटनेचे गांभीर्य ओळखून वासिंद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 219/2025 BNS कलम 103 प्रमाणे गुन्हा नोंद केला व लागलीच आपले पथक घेऊन आरोपी पंडित कृष्णा भवर यास मोठ्या शिताफिने अटक करून त्याच्या मुसक्या आवळल्या. याबाबत स्वतः पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर अधिक तपास करीत आहेत.

## ठाणे वर्तकनगर परिसरात चोरी
### चोरट्याविरोधात गुन्हा दाखल


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : वर्तकनगर परिसरातील दाम्पत्याचे मोबाइल आणि पर्स चोरट्यानी पळविला. याप्रकरणी वर्तक नगर पोलिस ठाण्यात अनोळखी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण माने यांच्या मार्गदर्शनात तपास सुरू आहे.
सारिका चवरे (३२) यांनी दिलेल्या तक्रारीत, त्या पती आणि मुलासह वर्तकनगर येथे राहतात. १९ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता त्या झोपेतून उठल्या. दरवाजा उघडून कचऱ्याचा डबा घराबाहेर ठेवला आणि घरात येऊन त्यांनी मोबाइल पाहिला, त्यानंतर मोबाइल टेबलवर ठेवून त्या बाथरूममध्ये निघून गेल्या होत्या, त्यावेळी घराचा दरवाजा अर्धवट उघडा होता.थोड्या वेळाने बाहेर आल्यानंतर त्यांना त्यांचा मोबाइल टेबलवर दिसला नाही. त्याच्या पतीचा मोबाइल त्यांना दिसला नाही.त्याशिवाय भिंतीवर लावलेली पर्सही गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. प्रत्येकी दहा हजारांचे असे २० हजारांचे दोन मोबाइल, पर्समधील साडेचार हजार रुपये, कामाचे ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, बैंकचे डेविट कार्ड असा २५ हजाराचा ऐवज चोरीला गेल्याचे तक्रारीत म्हटले.

## ठाण्यात गिरीराज सोसायटीत आग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : नौपाडा येथील भास्कर कॉलनी परिसरातील गिरीराज सोसायटी या तळ अधिक ३० मजली इमारतीतील २६ व्या मजल्यावरील एका फ्लॅटला शनिवारी सायंकाळी आग लागली. या आगीत कोणालाही दुखापत झाली नाही. गिरीराज सोसायटीतील रूम क्रमांक २६०४ मिलिंद देसाई येथील बेडरूमला अचानक आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे दोन फायर वाहन आणि एक रेस्क्यू वाहन, तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, एक युटिलिटी वाहनासह तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.



जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE
B.Sc. I.T.
B.Sc. CHEMISTRY MATHS
B.A.F.
BAMMC
B.Com.
B.A.
POST GRADUATE
M.Sc. IT
M.Sc. CHEMISTRY
M.Com. ADVANCED ACCOUNTANCY
M.A. MARATHI
M.A. ECONOMICS
M.A. SOCIOLOGY
M.A. GEOGRAPHY

Look forward to a
BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

## भविष्यवेध



सोमवार
२२ डिसेंबर २०२५

**मेष**
कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस चांगला जाण्यास मदत होईल. वैवाहिक जीवन आनंदी राहील. कलांमध्ये रस असलेल्यांना हा दिवस अनुकूल वाटेल.

**वृषभ**
महत्वाच्या निर्णयामध्ये तुम्हाला कुटुंबातील सदस्यांकडून पाठिंबा मिळेल. तुम्ही मित्रांसोबत लांबच्या प्रवासाची योजना आखू शकता.

**मिथुन**
मन लावून काम केलं तर तुमचं काम कमी वेळेत पूर्ण होईल. तुमच्या जोडीदाराच्या आयुष्यात होणारे बदल आनंद आणतील. समस्या लवकरच दूर होतील.

**कर्क**
जुने नातेवाईक अचानक भेटू शकतात. आज तुमच्या घरी एखाद्या मोठ्या व्यवसायाच्या निमित्ताने एक छोटी पार्टी होऊ शकते.

**सिंह**
तुमची मुले आज तुम्हाला चांगली बातमी देतील, ज्यामुळे तुम्हाला अभिमान वाटेल. राजकारणात गुंतलेल्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**कन्या**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. एखाद्या प्रतिष्ठित कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळण्याची शक्यता आहे. जोडीदारासोबत बाहेरचा आनंद घ्याल.

**तुळ**
व्यवसायात मोठा नफा मिळू शकतो जो तुमचा नफा दुप्पट करू शकतो. आजचा दिवस प्रेम जोडीदारांसाठी अनुकूल आहे. तुम्हाला आनंद मिळेल.

**वृश्चिक**
प्रवासात वेळ जाऊन शकतो. आज तुमचा एखादा जुना मित्र तुम्हाला भेटू शकतो. दिवस आनंदात जाईल. तुमची बदली होऊ शकते.

**धनु**
ऑफिसच्या कामाशी संबंधित असू शकते. प्रवासादरम्यान, तुमची एखाद्या दूरच्या नातेवाईकाशी भेट होऊ शकते. आर्किटेक्टसाठी दिवस महत्वाचा असेल.

**मकर**
आनंद मिळवण्यासाठी तुम्हाला तुमच्या व्यक्तिमत्त्वात काही बदल करावे लागतील. आर्थिक परिस्थिती आज सुधारेल. आर्थिक लाभ होऊ शकतो.

**कुंभ**
तुम्हाला एखादा जुना मित्र भेटू शकतो ज्याच्यासोबत तुम्ही फिरायला जाऊ शकता. व्यवसायात अचानक आर्थिक लाभाची संधी देखील मिळू शकते.

**मिन**
तुम्हाला चांगल्या नोकरीच्या ऑफर मिळतील. तुमच्या पालकांचे आशीर्वाद मिळाल्याने तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करण्यास मदत होईल.

# ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहितेबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आज बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील नियम, खर्च मर्यादा तसेच कायदेशीर तरतुदींविषयी सर्व राजकीय पक्षांना मार्गदर्शन करण्यात आले.

ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस उपायुक्त निवडणूक उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे,आचारसंहिता पथकाचे प्रमुख उपायुक्त भालचंद्र बेहरे, उपजिल्हाधिकारी वैशाली लंभाते, तहसीलदार प्रिया जांभळे-पाटील, उमेदवारी खर्च व हिशेब तपासणी पथक प्रमुख दिलीप सूर्यवंशी तसेच सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




**बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील नियम, खर्च मर्यादा तसेच कायदेशीर तरतुदींविषयी सर्व राजकीय पक्षांना मार्गदर्शन**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक उमेदवारासाठी निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा रु. 13 लाख निश्चित करण्यात आली असून, या मर्यादेचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रचारासाठी वापरण्यात येणारे बॅनर्स, पोस्टर्स, होर्डिंग्स, वाहनांवरील जाहिराती, सभा, रॅली, ध्वनिक्षेपक, सोशल मीडिया प्रचार तसेच मुद्रित साहित्याचा खर्च या मर्यादेतच समाविष्ट असणार आहे. तसेच उमेदवारांनी परवानगी घेवूनच रॅली, सभा यांचे आयोजन करावे असे अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांनी नमूद केले.

आदर्श आचारसंहितेअंतर्गत सरकारी यंत्रणा, कर्मचारी, वाहने व मालमत्तेचा प्रचारासाठी वापर करण्यास मनाई असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच, धार्मिक, जातीय, समाजात तेढ निर्माण करणारे भाषण, मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी आमिषे, भेटवस्तू किंवा रोख रक्कम वाटप यावर पूर्णतः बंदी असल्याचेही उपायुक्त निवडणूक उमेश बिरारी यांनी सांगितले.

तसेच, उमेदवारांनी स्वतंत्र खर्च नोंदवही ठेवणे आवश्यक असून, प्रत्येक खर्चाचे पावतीसह तपशील वेळोवेळी निवडणूक प्रशासनास सादर करणे बंधनकारक आहे. खर्च नोंदवहीची तपासणी खर्च निरीक्षकांच्या माध्यमातून केली जाणार असून, खर्च मर्यादेचा भंग झाल्यास संबंधित उमेदवारावर कायदेशीर कारवाई, अपात्रतेची शिफारस

## आदर्श आचारसंहितेअंतर्गत सरकारी यंत्रणा, कर्मचारी, वाहने व मालमत्तेचा प्रचारासाठी वापर करण्यास मनाई

तसेच गुन्हा दाखल होण्याची तरतूद असल्याची माहिती उमेदवारी खर्च व हिशेब तपासणी पथक प्रमुख दिलीप सूर्यवंशी यांनी दिली.

सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील प्रचारासाठी माध्यम प्रमाणीकरण व निरीक्षण समिती (MCMC) मार्फत पूर्वमंजुरी घेणे आवश्यक असून, आक्षेपार्ह अथवा खोटी माहिती प्रसारित केल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल, असेही बैठकीत सांगण्यात आले.

ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता 15 डिसेंबर 2025 रोजी लागू झाली असून ती 16 जानेवारी 2026 रोजी रात्री 12 वाजेपर्यत लागू असल्याचे सांगत निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी प्रशासनास पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांनी केले.

महाराष्ट्र शासन
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय
तालुका- मुरबाड , जिल्हा - ठाणे
कार्यालयाचा पत्ता :- एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.14 ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोड: 421401
दूरध्वनी क्र : ०२५२४-२२२१९९ ई-मेल: tahmurbad@gmail.com

जाहिर नोटीस

प्रति,
१) श्री/श्रीम. भास्कर नारायण शिद
रा.वडगाव (एकलहरे)
ता. मुरबाड, जि. ठाणे................ अर्जदार
विरुद्ध
२) ग्रामपंचायत एकलहरे
जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
ता. मुरबाड, जि. ठाणे ........................सामनेवाले

तमान जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचो आई कै. रामी नारायण शिद यांचा मृत्यु दि. ४/८/२००६ रोजी राहत्या घरी मु. वडगाव ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काहो अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यू नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्यूची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. 7150 दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्याग्रालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फ त्यांचे आईचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल

आज दिनांक माहे ११/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

हुकमावरुन
सही /-
(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)
निवासी नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड

जा. क्र. फौजदारी/जन्म मृत्यू नोंद/
कावि/५९४/२०२५

महाराष्ट्र शासन
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय
तालुका- मुरबाड , जिल्हा - ठाणे
कार्यालयाचा पत्ता :- एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.14 ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोड: 421401
दूरध्वनी क्र : ०२५२४-२२२१९९ ई-मेल: tahmurbad@gmail.com

जाहिर नोटीस

प्रति,
१) श्री. यशवंत देवजी पारधी
रा.वडगाव (एकलहरे)
ता. मुरबाड, जि. ठाणे................ अर्जदार
विरुद्ध
२) ग्रामपंचायत एकलहरे
जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
ता. मुरबाड, जि. ठाणे................सामनेवाले

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सूचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे वडील कै. देवजी वामन पारधी यांचा मृत्यू दि. १०/३/२०२० रोजी राहत्या घरी मु.वडगाव ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालला आहे.अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्यूची नोंद निबंधक, जन्म, मृत्यू नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता.अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याचो आवश्यकता आहे.

२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. 7151 दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळण करीता अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांचे वडील यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल,आज दिनांक माहे ११/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

हुकमावरुन
सही /-
(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)
निवासी नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड

जा. क्र. फौजदारी/जन्म मृत्यू नोंद/
कावि/५९३/२०२५

# केडीएमसी निवडणुक पार्श्वभूमीवर महापालिकेत बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर महापालिका भवनातील स्थायी समिती सभागृहात आयुक्त तथा प्रशासक अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली राजकिय पक्षाच्या पदाधिकारी प्रतिनिधी यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. या बैठकीस महापालिका क्षेत्रातील राजकिय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महापालिकेचे अति.आयुक्त व आचारसंहिता पथक प्रमुख हर्षल गायकवाड यांनी या बैठकीत आदर्श आचारसंहितेचे कालावधीत काय करावे आणि काय करु नये तसेच आदर्श आचारसंहितेचे पालन करणेबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. निवडणूक विभागाचे उपायुक्त समीर भूमकर यांनी संपूर्ण निवडणूक प्रकियेबाबत




**निवडणूक विभागाचे उपायुक्त समीर भूमकर यांनी संपूर्ण निवडणूक प्रकियेबाबत उपस्थितांना माहिती दिली.**

उपस्थितांना माहिती दिली. त्याप्रमाणे महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी दिग्विजय चव्हाण यांनी उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबत तसेच निवडणुकीतील पॅनलच्या खर्चाबाबत माहिती दिली.

प्रति उमेदवार ११ लाखाची खर्च मर्यादा असल्याचे स्पष्ट केले त्याप्रमाणे हा खर्च उमेदवाराने दररोज दयावयाचा असून नामनिर्देशन पत्र भरल्यापासून निकाल घोषित होईपर्यंत खर्चाची मर्यादा राहिल असेही त्यांनी यावेळी सांगितले. त्याचप्रमाणे निकाल घोषित केल्यानंतर पुढील १ महिन्याच्या कालावधीत उमेदवारांनी, निवडणूकीकामी केलेला खर्च सादर करणे बंधनकारक असल्याबाबतची माहिती त्यांनी यावेळी दिली.

तर उपायुक्त बाळासाहेब चव्हाण यांनी मुख्यालयात राबविण्यात

## महापालिकेचे माध्यम प्रमाणन व संनित्रयण समितीचे नोडल ऑफिसर संजय जाधव यांनी पेड न्युजचे निकष काय आहेत यांची माहिती दिली.

येणा-या वन विंडो सिस्टिमबाबत (एक खिडकी योजना) उपस्थितांना अवगत केले. महापालिकेचे माध्यम प्रमाणन व संनित्रयण समितीचे नोडल ऑफिसर संजय जाधव यांनी पेड न्युजचे निकष काय आहेत यांची माहिती दिली. त्याप्रमाणे आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली माध्यम प्रमाणन व संनित्रयण समिती स्थापन झाली असल्याबाबत माहिती यावेळी दिली.

यासमयी उपस्थित असलेल्या राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर महापालिकेचे आयुक्त अभिनव गोयल व अति. आयुक्त योगेश गोडसे यांनी मार्गदर्शन केले.

# उल्हासनगर महानगरपालिकेची निवडणूक कामकाज आढावा बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने निवडणूक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.से. यांनी अतिरिक्त आयुक्त(1) श्री. किशोर गवस यांच्यासमवेत आज दिनांक 20/12/2025 रोजी उल्हासनगर शहरातील विविध निवडणूक संबंधित कार्यालयांना भेटी दिल्या.

यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये असलेली गोल मैदान, सिंधु भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका, उल्हासनगर महानगरपालिका शाळा क्र. 14,



तसेच तहसीलदार कार्यालय व प्रांत कार्यालय यांचा समावेश होता.

या भेटीदरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था, खान-पान व्यवस्था,विद्युतव्यवस्था, स्टेशनरी व संगणक साहित्य, इंटरनेट/वायफाय सुविधा, कार्यालयाची रंगरंगोटी, स्वच्छता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच कार्यालयाबाहेरील वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था आदी सोयी-सुविधांची सविस्तर पाहणी करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा वेळेत व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना निर्देश देण्यात आले.

तसेच पवई चौक, उल्हासनगर-3 येथील प्रांत कार्यालयात उभारण्यात येत असलेल्या स्ट्राँगरूमची पाहणी करण्यात आली. सदरचे काम तातडीने पूर्ण करून निर्धारित कालावधीत स्ट्राँगरूम निवडणूक वापरासाठी सज्ज ठेवण्याचे, तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपआपसात समन्वय साधून सदरची निवडणूक शांतता,पारदर्शक व लोकशाही मुल्यांनुसार पार पाडण्यासाठी योग्य ते नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांनी संबंधित निवडणूक यंत्रणांना दिले.



# भाल येथील धोकादायक स्मशानभूमी दुरुस्ती करा - नागरिकांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेवाळी** : कल्याण श्री मलंग रोडवरील भाल येथील स्मशानभूमीच्या सिमेंटच्या पत्र्याच्या. शेडचे चायनल वाकले असून ही शेड कोणत्याही क्षणी खाली येऊन मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही या विषयी ग्रामस्थांमधे चर्चा सुरू आहे .

या स्मशानभूमीची दुरुस्ती होण्यासाठी पत्रकार नाना म्हात्रे यांनी दि ३/११/२०२५ रोजी कंडोमपा खडेगोळवली विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्या कडे लेखी निवेदन दिले असून सोबत स्मशानभूमीच्या शेडची फोटो प्रत जोडली आहे "मात्र आज दिड महीना उलटूनही या कामाकडे महापालिकेचे दुर्लक्ष झाले आहे.




# ठाण्यातील टोइंग व्हॅन करार संपला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** ठाण्यातील टोइंग व्हॅनचा करार २२ डिसेंबरला संपत आहे. सामाजिक कार्यकर्ते अजय जेया यांनी २० डिसेंबर रोजी ठाणे वाहतूक विभागाला पत्र सादर करून, पारदर्शक निविदा प्रक्रिया आणि सर्व कायदेशीर कार्यवाही पूर्ण केल्याशिवाय करार वाढवू नये किंवा नूतनीकरण करू नये, अशी मागणी केली.

मागील वर्षी त्यांनी टोइंग व्यवस्थेमधील अनेक गैरप्रकार उघड केले होते. त्यात एमव्हीए कायद्याचे उल्लंघन, करारातील त्रुटी, भ्रष्टाचाराच्या तक्रारी, योग्य मॉनिटरिंगचा अभाव यांचा समावेश होता. या प्रकरणांवर आक्षेप घेतल्यानंतर विभागाने काही काळ टोइंग बंद केले होते. परंतु नंतर पुन्हा सुरू केले. सातत्यपूर्ण माहिती उपलब्ध न झाल्याने त्या वेळी न्यायालयात आणे शक्य झाले नाही. यावेळी आम्ही तयार आहोत. सर्व कागदपत्रांसह न्यायालयीन लढा देऊ. पारदर्शकता आणि जबाबदारी हा नागरिकांचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भिवंडी महापालिका आयुक्तांनी घेतली निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस विभागाची बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक 2025-26 च्या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी,सहा.निवडणूक निर्णय अधिकारी,पोलिस विभाग आणि महापालिकेचे अधिकारी यांची विशेष आढवा बैठक घेत निवडणूक काम सर्वानी एकत्र व पारदर्शक काटेकोर पद्धतीने करावे असे आवाहन संबंधित अधिकारी व कर्माचाऱ्यांना केले.

भिवंडी शहर महापालिकेची आगामी होणारी निवडणूक अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असुन महापालिका प्रशासन व निवडणूक विभाग राज्य निवडणूक आयोगाचे आदेशानुसार कामाला लागली आहे.15 जानेवारी 2026 रोजी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. तत्पूर्वी 23 डिसेंबर पासून उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.त्यामुळे महापालिका प्रशासनाने कामकाज सुरू केले आहे.त्याअनुषंगाने महापालिका



**निवडणूक काम सर्वानी एकत्र व पारदर्शक काटेकोर पद्धतीने करावे असे आवाहन**

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी अनमोल सागर यांनी शनिवारी महापालिका सभागृहात निवडणूक कामांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक घेतली.यावेळी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,नयना ससाणे, ठाणे उपजिल्हाधिकारी शशिकांत गायकवाड, रत्नागिरी उपजिल्हाधिकारी हर्षलता गेडाम, भिवंडी उपविभागीय अधिकारी, अमित सानप, मुंबई उपजिल्हाधिकारी महेश हरिश्चंद्रे, तहसीलदार अभिजित खोले, पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे, एसीपी सचिन सांगळे, नायब तहसिलदार आदेश म्हात्रे,दत्तात्रय बांबळे, मयुर चव्हाण, चंद्रकांत राजपूत, पालिका उपआयुक्त विक्रम दराडे,मनपा निवडणूक विभाग प्रमुख अजित महाडीक, नितीन पाटील आणि सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, निवडणूक निर्णय अधिका-यांना वाहन पुरविणे, तसेच राहाण्याच्या व्यवस्थेचा आढावा आयुक्तांनी घेतला. तसेच निवडणूक कार्यालयांकरिता कर्मचारी, साहित्य पुरविणे बाबतीत चर्चा करून आयुक्त सागर यांनी आढावा घेतला.मतदार केंद्र यादी,मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्याच्या सुचना दिल्या.तसेच मतदान केंद्रावर बुरखाधारी महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे बाबत सुचना आयुक्तांकडून देण्यात आल्या.यावेळी पोलीस विभागाने त्यांच्या मार्फत करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत अहवाल यावेळी दिला. पोलीस उपायुक्त शशिकांत बोराटे यांनी पालिका प्रभाग अधिकारी कर्मचारी व पोलीस निरिक्षक हे सर्व विभागातील राजकीय पक्षांचे बॅनर, पोस्टर,होल्डींग काढून टाकतील, त्यानंतरही बॅनर,होडींग लागल्यास गुन्हा दाखल करावा. तसेच आचारसंहिता कालावधीत कोणी आचारसंहितेचा भंग केल्यास गुन्हा दाखल करण्या बाबतीत सुचना दिल्या.त्याचबरोबर एस.एस.टी.पथक तात्काळ सुरु करणे,सीसीटीव्ही कॅमेरा बसविणेत यावे असेही प्रशासनाला त्यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी अमित सानप यांनी कर्मचारी प्रशिक्षण, मतदान यंत्र तपासणी याबाबत माहिती दिली.यावेळी प्रभाग अधिकारी, निवडणूक विभाग अधिकारी उपस्थित होते.

# रनर्स क्लॅन तर्फे 'स्टेडियम रन'चे अनावरण | स्थानिक पातळीवर पहिल्यांदाच अनोखी रन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** रनर्स क्लॅन फाउंडेशनने रविवार दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी अनोख्या अश्या स्टेडियम रनचे अनावरण केले.

रनर्स क्लॅन दरवर्षी गेटवे ऑफ इंडिया अशी रन आयोजित करीत असते, परंतु यंदा रस्त्यांच्या कामांमुळे सदर स्पर्धेचे स्वरूप बदलून स्टेडियममध्ये धावण्याचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी डोंबिवली पूर्व येथील डॉ.यु.प्रभाकरराव स्पोर्ट्स अकादमी येथे रनचे आयोजन करण्यात आले आहे. येथील सिंथेटीक ट्रॅकवर धावपटु आपले कसब पणाला लावतील. ही स्पर्धा वैयक्तिक व सांघिक प्रकारात खेळविण्यात येणार आहे. यात १२ तास व ६ तास वैयक्तिक आणी ६ धावपटु मिळुन १२ तास सांघिक अश्या तीन श्रेणींमध्ये स्पर्धा असणार आहे. या स्पर्धेत विजेत्यांना एक लाखापर्यंत बक्षीस आयोजकांकडून घोषित करण्यात आले आहे. ह्या स्पर्धेत धावपटुंना आपली वैयक्तिक सर्वोत्तम वेळ साधता येणार आहे कारण फेब्रुवारी महिन्यातील थंड तापमान आणी सिंथेटीक ट्रॅक ह्या धावपटुंसाठी जमेच्या बाजू असतील. तेव्हा धावण्याचा आनंद घेण्यासाठी धावपटुंनी आणी त्यांच्या संघांनी लवकरात लवकर टाउनस्क्रीप्ट या प्रणालीवर व क्युआर कोडवर नोंदणी करावी असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# अंबरनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५

## निवडणूक निवडून आलेल्या उमेदवारांची यादी

| आतापर्यंत विजयी उमेदवार | |
|---|---|
| भाजप 15 विजयी | तेजश्री करंजुले पाटील ( नगराध्यक्ष ) |
| | मीना वाळेकर |
| | रंजना कोतेकर |
| | मनीष गुंजाळ |
| | अभिजीत करंजुले |
| | अनिता भोईर |
| | सुजाता भोईर |
| | सचिन गुंजाळ |
| | स्वाती पाटील |
| | मिनू सिंग |
| | पवन वाळेकर |
| | पूनम पाटील |
| | वैशाली थेटे |
| | महेश फुलोरे |
| | सुनील वाघे |
| शिवसेना 27 विजयी | रेश्मा गुडेकर |
| | विकास सोमेश्वर |
| | निखिल चौधरी |
| | ज्योत्सना भोईर |
| | कुणाल भोईर |
| | अपर्णा भोईर |
| | पल्लवी लकडे |
| | स्वप्निल बागुल |
| | विना उगले |
| | संदीप भराडे |
| | कल्पना गोरे |
| | रोहिणी भोईर |
| | संदीप तेलंगे |
| | अमृता मोहिरीकर |
| | शामला मंचेकर |
| | रेश्मा सुर्वे |
| | सुनिता बागुल |
| | रवींद्र करंजुले |
| | दीपा गायकवाड |
| | शैलेश भोईर |
| | किरण चौबे |
| | रुपाली गजगे |
| | राजेंद्र वाळेकर |
| | अब्दुल शेख |
| | मोनिका रिजड |
| | पंढरीनाथ वारिंगे |
| | संगीता गायकर |
| अजित पवार गट 4 विजयी | सदाशिव पाटील |
| | मीरा शेलार |
| | सचिन पाटील |
| | सुनिता पाटील |
| कॉंग्रेस 12 विजयी | दर्शना पाटील |
| | अर्चना पाटील |
| | हर्षदा पाटील |
| | तेजस्विनी पाटील |
| | प्रदीप पाटील |
| | विपुल पाटील |
| | कबीर गायकवाड |
| | मनीष म्हात्रे |
| | धनलक्ष्मी जयशंकर |
| | संजवणी देवडे |
| | दिनेश गायकवाड |
| | किरण राठोड |

**अंबरनाथ नगरपरिषद २०२५ पक्षीय बलाबल**

अपक्ष 2 विजयी

शिवसेना - २७ | कॉंग्रेस - १२
भाजपा - १५ | अपक्ष - २
राष्ट्रवादी अजित - ४ | एकूण नगरसेवक : ५९

# कुळगाव-बदलापूर सार्वत्रिक निवडणूक - २०२५

## निवडणूक निवडून आलेल्या उमेदवारांची यादी

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | उमेदवाराचे नांव | पक्ष |
|---|---|---|---|
| १ | नगराध्यक्षा | घोरपडे रुचिता राजेंद्र | भारतीय जनता पार्टी |
| २ | १ अ | वाघ गौरी बाबू | शिवसेना |
| ३ | १ ब | म्हात्रे तुकाराम बारकू | शिवसेना |
| ४ | २ अ | म्हस्कर हेमांगी तेजस | भारतीय जनता पार्टी |
| ५ | २ ब | चतुरे मोहन अनंत | भारतीय जनता पार्टी |
| ६ | ३ अ | घोरपडे रुचिता राजेंद्र | भारतीय जनता पार्टी |
| ७ | ३ ब | तेलो शरद सुभाष | भारतीय जनता पार्टी |
| ८ | ४ अ | पाटील स्वप्रा श्रीधर | शिवसेना |
| ९ | ४ ब | | |
| १० | ५ अ | पाटील सुगंधा राजेश | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| ११ | ५ ब | गायकवाड हर्षाली संदीप | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| १२ | ६ अ | दामले प्रियंका आशिष | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी |
| १३ | ६ ब | भोईर किरण शंकर | भारतीय जनता पार्टी |
| १४ | ७ अ | घोरपडे रिध्दिता रविंद्र | भारतीय जनता पार्टी |
| १५ | ७ ब | घोरपडे राजेंद्र पंढरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| १६ | ८ अ | ढमढेरे सोनिया भारत | शिवसेना |
| १७ | ८ ब | बेंबळकर तुषार त्रिंबक | शिवसेना |
| १८ | ९ अ | म्हात्रे उषा तुकाराम | शिवसेना |
| १९ | ९ ब | ॲड संदेश भारत ढमढेरे | शिवसेना |
| २० | १० अ | भगत सुवर्णा सुनिल | शिवसेना |
| २१ | १० ब | कोहारी अकिब मसुद | शिवसेना |
| २२ | ११ अ | प्रणिता प्रशांत कुलकर्णी | भारतीय जनता पार्टी |
| २३ | ११ ब | राठोड रेश्मा दिपक | शिवसेना |
| २४ | १२ अ | संध्या सुरज मुठे | भारतीय जनता पार्टी |
| २५ | १२ ब | गायकवाड संजय अनंत | शिवसेना |
| २६ | १३ अ | आंबवणे उज्वला उल्हास | शिवसेना |
| २७ | १३ ब | चंद्रकांत विनायक कोंडीलकर | शिवसेना |
| २८ | १४ अ | पातकर रती नंदकिशोर | भारतीय जनता पार्टी |
| २९ | १४ ब | शिंदे संभाजी ज्ञानोबा | भारतीय जनता पार्टी |
| ३० | १५ अ | ॲड भाविता हर्षल घोरपडे | भारतीय जनता पार्टी |
| ३१ | १५ ब | हर्षदा उमेश पवार | भारतीय जनता पार्टी |
| ३२ | १५ क | पाटील आदित्य नरहरी | भारतीय जनता पार्टी |
| ३३ | १६ अ | वैशाली सुरदास पाटील | शिवसेना |
| ३४ | १६ ब | रोहन जनार्दन पाटील | शिवसेना |
| ३५ | १७ अ | लांबतुरे दिपाली गणेश | शिवसेना |
| ३६ | १७ ब | प्रदीप वसंत गिते | भारतीय जनता पार्टी |
| ३७ | १८ अ | राऊत विजया मोहन | शिवसेना |
| ३८ | १८ ब | प्रफुल्ल मारुती मोरे | भारतीय जनता पार्टी |
| ३९ | १९ अ | शितल प्रविण राऊत | शिवसेना |
| ४० | १९ ब | वामन बारकू म्हात्रे | शिवसेना |
| ४१ | २० अ | ज्योती रामास्वामी डार्बिन | भारतीय जनता पार्टी |
| ४२ | २० ब | सौरव राजेंद्र लाड | भारतीय जनता पार्टी |
| ४३ | २१ अ | राणे दुर्वा गणेश | शिवसेना |
| ४४ | २१ ब | वडनेरे शैलेश केसरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ४५ | २२ अ | सोळसे हर्षदा रमेश | भारतीय जनता पार्टी |
| ४६ | २२ ब | सोळसे रमेश जनार्दन | भारतीय जनता पार्टी |
| ४७ | २३ अ | गायकवाड सलोनी घनश्याम | शिवसेना |
| ४८ | २३ ब | सुरवळ अरुण तुकाराम | शिवसेना |
| ४९ | २४ अ | सविता मंगेश धुळे | शिवसेना |
| ५० | २४ ब | राजेंद्र भगवान धुळे | भारतीय जनता पार्टी |

**कुळगाव-बदलापूर २०२५ पक्षीय बलाबल**

शिवसेना - २३ | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी - ३
भाजपा - २३ | एकूण नगरसेवक : ५०

# वाडा नगरपंचायतीवर भाजपाचे वर्चस्व नगराध्यक्षपदी रिमा गंधे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**वाडा :** 03 व 20 डिसेंबर रोजी पार पडलेल्या वाडा नगरपंचायतीच्या मतदानाचा निकाल रविवारी 21 डिसेंबर ला हाती आला असून नगरपंचायतीत भाजपाने नगराध्यक्ष पदासह 17 पैकी तब्बल 11 जागांवर दणदणीत विजय मिळवला. नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रिमा गंधे यांनी शिवसेनेच्या हेमांगी पाटील यांचा 972 मतांनी पराभव केला. पहिल्या फेरीपासूनच भाजपचे उमेदवार आघाडीवर होते. यामध्ये प्रभाग क्रमांक 1 मध्ये रवींद्र कामडी (भाजप), दोन मध्ये श्वेता उंबरसडा (भाजप), 3 स्मिता पातकर (भाजप), 4 सतीश पवार (भाजप), 5 तेजस पाटील (भाजप), 6 प्रिया गंधे (भाजप), 7 मयुरी म्हात्रे (भाजप), 8 उमेश लोंखडे (शिवसेना), 10 मनिष देहेरकर (भाजप), 11 सविता वनगा (भाजप), 12 भारती सपाटे (कॉंग्रेस), 13 भूपेश जगताप (शिवसेना), 14 रिता थोरात (भाजप), 15 प्रगती वलटे (भाजप), 16 अजिंक्य पाटील (शिवसेना) तर वार्ड क्रमांक 17 मधून सुचिता पाटील (शरदचंद्र पवार गट) विजयी होत नगरसेवक पदी विराजमान झाले आहेत. वाडा नगरपंचायत मध्ये नगराध्यक्ष सहित 11 नगरसेवक घेऊन भाजप ची एकाहाती सत्ता आली आहे. केंद्रात आणि राज्यात असलेल्या भाजपच्या विकसनशील सरकारचा थेट फायदा वाडा शहराला मिळुन वाडा शहराचा सर्वांगीण विकास घडावा, 'आपला वाडा - सर्वांगसुंदर वाडा' हे वाडेकरांचे स्वप्न येत्या काळात नक्कीच साकार होईल अशा शुभेच्छा ग्रामस्थांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# पेण नगरपरिषदेवर भाजपाचा झेंडा प्रीतम पाटील भरघोस मतांनी विजयी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** रायगड जिल्ह्यात सर्वात प्रतिष्ठेची अत्यंत अतितटीची व चुरशीच्या निवडणुकीमध्ये पेण नगरपरिषदेचा निवडणूक निकाल आज जाहीर झाला आणि या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या प्रीतम ललित पाटील या 14273 मते मिळवत विजयी झाल्या आहेत

पेण नगर परिषद निवडणूक दोन डिसेंबर रोजी झाली असून एकंदरीत 24 जागांसाठी ही निवडणूक घेण्यात आली होती 24 पैकी सहा जागा सुरुवातीलाच बिनविरोध उमेदवार निवडून आले त्यामुळे 18 जागांसाठी ही निवडणूक घेण्यात आली होती. आज झालेल्या निकालामध्ये विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये कलावती पाटील,संतोष शृंगारपुर पल्लवी कालेकर, प्रवीण शंकर पाटील, सुजाता डाकी, संजय म्हात्रे, अरुणा सुहास पाटील ,भूषण कडू ,अंजली जोगळेकर, संगीता लाड ,आनंद जाधव आफ्रिन अखवारे , कृष्णा भोईर (सद्दाम) जसवीन पाटील,अनिरुद्ध पाटील,निवृत्ती पाटील,सुनीता जोशी , निळकंठ म्हात्रे असे निवडून आले तर बिनविरोध उमेदवारांमध्ये,अभीराज कडू ,सुशीला ठाकूर ,दीपक गुरव ,वसुधा पाटील मालती म्हात्रे,स्मिता माळी त्यामुळे विजय उमेदवारांची पेण शहरात भव्य मिरवणूक काढून जल्लोष साजरा केला.

# ओमकार तारमळे याची आयपीएलसाठी सनराईज हैदराबाद संघातून निवड!

## शहापुरातील प्रत्येक गावांमध्ये ओमकारच्या अभिनंदनाचे बॅनर झळकले



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

शहापूर ग्रामीण : जिद्द, आवड व मोठी स्वप्न उराशी बाळगून अतिशय खडतर मेहनत केली की स्वप्न साकार करता येतात त्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही व आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेता येते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे शहापूर तालुक्यातील वासिंद जवळील शेरे या गावातील ओमकार तारमळे. याची नुकतीच आयपीएलसाठी सनराज हैदराबाद या संघातून निवड झाली आहे.

वासिंद जवळील शेरे या खेडेगावातील तुकाराम गोविंद तारमळे यांचा मुलगा ओमकार तारमळे याची नुकतीच भारतीय प्रीमियर लीग( आयपीएल) साठी सनराईज हैदराबाद या संघातून निवड झाली आहे शहापूर तालुक्यामध्ये प्रथमच आयपीएल मध्ये जाण्याचा पहिला बहुमान ओमकार तारमळे यांनी मिळवला आहे. वडिलांची आर्थिक परिस्थिती अतिशय गरिबीची असताना वडिलांनी आपल्या मुलाला क्रिकेट विषयी असलेली आवड, जिद्द व मेहनत पाहून त्यांनी आपल्या मुलाला प्रोत्साहन दिले. आणि ओमकार यांनी वडिलांनी दिलेले प्रोत्साहन पाहून आपल्या अतूट जिद्दीने व कठोर मेहनतीने आणि नैसर्गिक कौशल्याने क्रिकेटमध्ये थेट मुंबई ते दिल्ली हैदराबाद चेन्नई असा प्रवास करून आपली योग्यता सिद्ध केली व त्यामुळेच त्याची सनराइज हैदराबाद संघात निवड झाली आहे ओमकार तारमळे याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा शेरे येथे तर पाचवी ते दहावी हे माध्यमिक शिक्षण शेई विभाग हायस्कूल शेई या माध्यमिक शाळेत झाले तर अकरावी व बारावी कॉमर्स चे शिक्षण वासिंदच्या सरस्वती विद्यालयात झाले लहानपणापासून क्रिकेट या खेळाविषयी अतिशय आवड असल्याने त्यांनी या खेळात आपलं करिअर करण्याचे स्वप्न ठेवले होते शिक्षणासोबत ज्या ज्या वेळेला आपल्याला रिकामा वेळ मिळेल त्या त्या वेळेला तो आपला अमूल्य वेळ क्रिकेट या खेळासाठी घालवत असे अतिशय खडतर मेहनत करून व आपले नियोजित ध्येय डोळयासमोर ठेवून त्यांनी क्रिकेटमधील आपले नैसर्गिक कौशल्य दाखवून थेट मुंबई, हैदराबाद, चेन्नई, दिल्ली या ठिकाणी सराव करून आपली चुणूक दाखवली त्यामुळेच आयपीएलच्या निवड समितीने त्याचे कौशल्य व गुण अचूक हेरून त्यास आयपीएलच्या ऑक्शन मध्ये ठेवले आणि अखेर आयपीएल निवड समितीने त्याची सनराइज हैदराबाद संघात त्याची निवड केली आणि नामवंत खेळाडू मध्ये खेळण्याचा बहुमान त्यांनी मिळविला आणि आपल्या गावाचे, तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव रोषण केले ही अतिशय अभिमानाची बाब आहे त्याची ही यशोगाथा आजच्या पिढीसाठी अतिशय प्रेरणादायी असून या ग्रामीण भागातील ओमकार ने आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी जिद्द कठोर मेहनत व आपले नैसर्गिक कौशल्य पणाला लावल्याने आपली स्वप्न साकार करता येतात हे दाखवून दिल्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

ओमकार तारमळे याची आयपीएल साठी सनराइज हैदराबाद या संघातून निवड झाल्याने त्याच्यावर तालुका, जिल्हा व राज्यातील विविध थरातून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे व पुढील होणाऱ्या आयपीएल स्पर्धेसाठी शुभेच्छा व्यक्त होत आहेत.

**नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता**

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024